ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख ५ फेब्रुवारी, १९५८ | अंक ६

## विविध माहिती

**कांद्यावरील विक्रीकर रद्द**—आंध्र प्रदेश सरकारनें कांद्यावरील व विड्याच्या पानांवरील विक्रीकर रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. ह्या कराऐवजीं ज्या जमिनींत कांद्याचीं व पानांचीं पिकें काढण्यांत येतात त्यांच्यावर कर बसविण्याचें ठरविण्यांत आलें आहे. व्यापारी पिकासंबंधींच्या कायद्याखाली अशा जमिनींवर एकरीं ५ रुपये कर घेण्यांत येणार आहे.

**सीलोनमधील चहाचें उत्पादन**—सीलोनमधील चहाच्या उत्पादनानें १९५७ सालीं उच्चांक गांठला आहे. ह्या वर्षीं सीलोनमधील मळ्यांतून २९·७७ कोटी पौंड चहाचें उत्पादन करण्यांत आलें. १९५५ सालीं सीलोनमधील चहाचें उत्पादन २८ कोटी पौंड झालें होतें. सीलोनच्या चहाची भारतीय चहाला परदेशांत स्पर्धा होऊं लागली आहे.

**कृत्रिम रेशमाचा कारखाना**—कृत्रिम रेशमाच्या कारखान्याची संपूर्ण यंत्रसामुग्री उशिरां किंमत घेण्याच्या अटीवर भारताला देण्याचा करार करण्यांत आला आहे. एका जपानी कारखान्याशीं झालेल्या ह्या कराराप्रमाणें, ३० कोटी येन किंमतीची यंत्रसामुग्री मिळेल. कारखाना चालू झाल्यावर त्यांत रोज ५ टन कृत्रिम रेशीम तयार होईल.

**मध्यप्रदेशांतील जंगलाची सफाई**—पूर्व पाकिस्तानांतून आलेल्या निर्वासितांची वसाहत स्थापन करण्यासाठी मध्यवर्ती सरकारच्या ट्रॅक्टर संघटनेनें १९५६ सालीं जंगल तोडून साफ करण्याच्या कामास प्रारंभ केला होता. आतांपर्यंत संघटनेनें मध्यप्रदेशांतील १,२०० एकर जमिनीवरील जंगल साफ केलें आहे. म्हैसूर राज्यांतहि निर्वासितांसाठी अशीच सोय करण्यांत येणार आहे.

**जागतिक बँकेकडून कर्ज**—येत्या चार महिन्यांत जागतिक बँकेकडून भारताला १० कोटी डॉलर्सचें कर्ज मिळण्याची शक्यता आहे. ह्या कर्जाचा उपयोग भारतामधील बंदरांची सुधारणा व विजेचें उत्पादन ह्या दोन कामासाठी करण्यांत येणार आहे. भारतामधील वहातुकीची व्यवस्था सुधारणें महत्त्वाचें मानून बँकेनें रेल्वेसाठीहि ह्यापूर्वीं मदत दिलेली आहे.

**पंजाबमधील बी. टी. चा अभ्यासक्रम**—पंजाब विद्यापीठानें आपल्या बी. टी. च्या अभ्यासक्रमांत समाज-विकास ह्या विषयाचा समावेश करण्याचें ठरविलें आहे. दिल्ली, आग्रा, नागपूर व उत्कल विद्यापीठांत हा विषय आधींच समाविष्ट करण्यांत आला आहे. आणखी कांहीं विद्यापीठेंहि ह्यासंबंधीं विचार करीत आहेत.

**निर्वासितांची पुनर्वसाहत**— पूर्व बंगालमधील १३५ निर्वासित शेतकरी कुटुंबांची व २५ बिगर-शेतकरी कुटुंबांची मध्यप्रदेशांत पुनर्वसाहत करण्यांत येणार आहे. वसाहतीसाठी ९५० एकर जमिनीवरील जंगल तोडून जागा साफ करण्यांत येत आहे. प्रत्येक कुटुंबाला ११ एकर जमीन मशागतीसाठी व एकषष्ठांश एकर जमीन घर बांधण्यासाठी देण्यांत येणार आहे.

**त्रिवंद्रम् येथील प्राणिसंग्रहालय**—त्रिवंद्रम् येथील प्राणिसंग्रहालयाचा १०० वा स्थापनादिन साजरा करण्यांत येत आहे. शंभर वर्षांपूर्वीं पूर्वींच्या त्रावणकोर-कोचीन संस्थानामधील एका ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यानें संग्रहालयाची स्थापना केली. त्यावेळीं तें एका छोट्याशा बंगल्यांत मावण्याइतकें लहान होतें. आतां मात्र तें भारतामधील एक उत्कृष्ट प्राणिसंग्रहालय आहे.

**कापड गिरण्याची यंत्रसामुग्री**—भारताचें स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन आणि झेकोस्लोव्हाकिआचें सरकार ह्यांच्यांत कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामुग्री घेण्याबद्दल चाललेल्या वाटघाटी पूर्ण होत आल्या आहेत. यंत्रसामुग्रीची किंमत मागाहून द्यावयाची असून त्याबद्दलची हमी कॉर्पोरेशन देणार आहे. यंत्रसाहित्याचे सुटे भागहि झेकोस्लोव्हाकिआकडून घेण्यांत येणार आहेत.

**कॉफीचीं दुकानें बंद करणार**—भारताच्या कॉफी बोर्डानें चालविलेलीं कॉफीपानाचीं दुकानें १ एप्रिल, १९५८ पासून बंद करण्यांत येणार आहेत. कॉफी पिण्याच्या संवयीचा प्रचार करण्याची गरज आतां वाटत नसल्यानें हा निर्णय घेण्यांत आला आहे. शिवाय, कॉफी निर्यात करून परदेशीय चलन अधिक मिळण्याची शक्यता आहे. त्याचा फायदा घेण्याच्या दृष्टीनेंहि या निर्णयाची जरूरी होती असें सांगण्यांत येत आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## औद्योगिक विकास व छोटे उद्योगधंदे

मध्यवर्ति सरकारचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं राजकोट येथें स्थापन करण्यांत आलेल्या अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या इमारतीचें नुकतेंच उद्घाटन केलें. ह्या प्रसंगीं कांहीं प्रमुख बँकर्स, सहकारी क्षेत्रांत काम करणारीं माणसें, इत्यादि लोक उपस्थित होते. उद्घाटनाच्या प्रसंगीं भाषण करतांना श्री. मनुभाई शहा म्हणाले कीं, देशाच्या औद्योगिक विकासाच्या कार्यक्रमांत छोट्या उद्योगधंद्यांना महत्त्वाचा वाटा उचलावयाचा आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत छोट्या उद्योगधंद्याच्या वाढीसाठी सरकारनें २ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. जरूर वाटली तर आणखीहि इतक्याच रकमेची व्यवस्था करण्याचा सरकार विचार करील. पण कांहीं झालें तरी कोणत्याहि राज्यांतील अगर जिल्ह्यांतील छोट्या उद्योगधंद्यांचा विकास पैशाच्या अभावीं अडूं दिला जाणार नाहीं. चालू वर्षीं प्रत्येक राज्यांत ६ अर्बन बँका स्थापन करण्याचें उद्दिष्ट सरकारनें आपल्या डोळ्यांपुढें ठेवलें आहे. ह्या सहकारी बँकांना लागणाऱ्या नोकरवर्गाला शिक्षण देऊन तयार करण्यासाठी राजकोट येथें एक केंद्रहि उघडण्यांत येईल. गांधीवादी अर्थशास्त्राला सोडून मध्यवर्ति सरकार छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासाकडे लक्ष देत नाहीं हा आरोप खरा नाहीं. मोठ्या उद्योगधंद्याकडून पुष्कळदां अशी तक्रार करण्यांत येते कीं, त्यांच्या गरजांकडे दुर्लक्ष करण्यांत येतें. ह्यावरून वरील आरोपाचा गैरलागूपणा सिद्ध होण्यासारखा आहे. खरा प्रकार असा आहे कीं, गांधीजींनीं औद्योगिक विकासाबाबत मध्यम मार्ग स्वीकारावा असा सल्ला दिलेला होता. ह्या मार्गानें उद्योगधंद्यांचा समतोल विकास होईल असें त्यांचें मत होतें.

## दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचें यश

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव ह्यांनीं मुंबई येथील सिडनहॅम कॉलेजच्या वार्षिक संमेलनप्रसंगीं बोलतांना दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या यशापयशाविषयीं आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकांनीं युद्धकालीन आर्थिक व्यवहारांचा अवलंब केला पाहिजे. कार्यक्रम पुरा करण्यासाठी जी साधनसंपत्ति लागते ती कमी असल्यानें त्यांत काटछाट करण्यांत यावी असें जे म्हणतात त्यांची चूक होत आहे. देशाची खरी साधनसंपत्ति लोकांची इच्छाशक्ति, वाढतें उत्पादन, उपभोगाच्या वृत्तीवर नियंत्रण, संघटना-कौशल्य, ह्या गोष्टींत आहे. ह्या साधनसंपत्तीची अमर्याद वाढ करतां येणें शक्य आहे. पण त्यासाठी योग्य असें पुढारीपण मात्र निर्माण झालें पाहिजे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अंमलबजावणींत जो ताण लोकांवर पडणार आहे, त्याची पुरेशी जाणीव त्यांना करून देण्यांत आलेली नाहीं. पहिला पंचवार्षिक कार्यक्रम यशस्वीपणें पार पाडण्यांत आल्यामुळें लोकांना ही जाणीव देण्याच्या कामीं दुर्लक्ष झालें असावें. कांहीं झालें तरी देशाला आपलीं पावलें प्रगतीच्या दिशेनें टाकलींच पाहिजेत. बहुसंख्य लोकांनीं कार्यक्रमांतील आपला वाटा उचलावा म्हणून प्रलोभनें ठेवण्यांत आलीं पाहिजेत. समाजांतील कांहीं अल्पसंख्याकांपुरतींच तीं मर्यादित ठेवण्यांत येतां कामा नयेत. बहुजन समाजाकडे दुर्लक्ष करण्याचे परिणाम देशाला घातक ठरतील ह्यांत मुळींच शंका नाहीं. कार्यक्रम पार पाडण्याच्या कामीं फार मोठीं संकटें उत्पन्न झालेलीं आहेत, ही गोष्ट लोकांना स्पष्टपणें सांगण्यांत आली पाहिजे. कार्यक्रमांत समाविष्ट करण्यांत आलेल्या सर्वच गोष्टी पार पाडतां येणार नाहींत हें सत्य आहे.


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : १४८३.

## सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यावरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवीचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना : १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. २५५४७४-७५ | चेअरमन- श्री. रमणलाल जी. सरैय्या | पोस्ट बॉक्स नं. ४७२ तारेचा पत्ता-फार्मर बँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ४४,११,५०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. ३१,००,००० |
| | रु. ७५,११,५०० |
| गंगाजळी व फंड | रु. ५९,२८,१०० |
| ठेवी | रु. १०,७१,३३,००० |
| खेळतें भांडवल | रु. १७,६३,७३,००० |

## ११ जिल्ह्यांमध्यें ५६ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. ५ फेब्रुवारी, १९५८



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## केरळच्या औद्योगीकरणाची चर्चा

केरळ सरकारच्या उद्योग नियोजन समितीची बैठक नुकतीच भरविण्यांत आली होती. मुख्यमंत्री श्री. नंबुद्रीपाद, डॉ. जॉन मथाय आणि सरकारचे संबंधित अधिकारी बैठकीला हजर होते. कलकत्त्यामधील एका रबराच्या कारखान्याचे प्रतिनिधी श्री. जॉर्ज हेहि बैठकीला उपस्थित होते. ही कंपनी केरळमधील कोट्टायम् येथें रबरी टायर्स तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचा विचार करीत आहे. सुमारें १॥ कोटी रुपये भांडवल असलेला हा खाजगी मालकीचा कारखाना असेल. कारखान्या-संबंधीची योजना कंपनीनें केरळ सरकारच्या विचारासाठी सादर केली आहे. ह्यासंबंधीं बोलतांना श्री. जॉर्ज म्हणाले कीं कारखान्यासाठी मध्यवर्ती सरकारकडून वाजवी व्याजाच्या दरानें कर्ज मिळविण्याचीहि खटपट करण्यांत येत आहे. भारतांत उत्पादन करण्यांत येणाऱ्या एकूण रबरापैकी ९५ टक्के रबर केरळांत पैदा होत असल्यानें ह्या राज्यांत टायर्सचा कारखाना काढण्यास चांगलाच वाव आहे. केरळमध्यें खाजगी भांडवल गुंतविण्यास उत्तेजन मिळण्यासाठी कारखान्यांचे मालक व कामगार ह्यांच्यांत कांहीं वर्षें तरी औद्योगिक शांतता राखण्याचा करार करण्यांत आला पाहिजे. नाहींतर कम्युनिस्ट मतप्रणालीच्या राज्यांत भांडवल गुंतविण्यास कोणी पुढें येणार नाहीं. त्याचप्रमाणें, राज्याचें आर्थिक धोरणहि भांडवल गुंतवणुकीला निरुत्साही करणारें असता कामा नये. राज्य सरकारचें कामगार-विषयक धोरण प्रगतिशील असण्यास हरकत नाहीं. पण, त्यामुळें कामगारांतील शिस्त ढिली होता कामा नये. शिवाय, कारखानदार व कामगार ह्यांच्या संबंधांत फक्त कामगारांना अधिक आपुलकीनें वागवूनहि चालणार नाहीं. कारण, भांडवल गुंतविणाऱ्यांत आतां शेंकडों छोटे लोक असतील.

---

## चित्रपटांच्या फिल्म्सचा कारखाना

भारतामधील महत्त्वाच्या उद्योगधंद्यांपैकी चित्रपटाचा धंदा हा एक महत्त्वाचा धंदा आहे. अमेरिकेच्या खालोखाल भारतांत चित्रपट तयार होत असतात. तथापि, ह्या धंद्यासाठी लागणारी बहुतेक यंत्रसामुग्री आणि कच्ची फिल्म ह्या गोष्टी अद्याप तरी परदेशांतून आयात कराव्या लागतात. त्यांतल्या त्यांत कच्च्या फिल्मचा पुरेसा पुरवठा असणें ही बाब धंद्याच्या दृष्टीनें इतर बाबींपेक्षा अधिक महत्त्वाची आहे. भारत सरकारनें कच्ची फिल्म निर्माण करणारा एक कारखाना स्थापन करण्यासाठी पूर्व जर्मनीचें तांत्रिक व आर्थिक साह्य घेण्यास मान्यता दिलेली आहे. ह्या कारखान्यासाठी बहुधा मद्रास राज्यांतील कोडाइकनाल हें ठिकाण मुक्रर करण्यांत येईल. कारखान्याच्या उभारणीसाठी ८ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. कारखान्याच्या उभारणीच्या तपशिलाची चर्चा करण्यासाठी आणि उशिरां किंमत देण्यासंबंधीं चर्चा करण्यासाठी पूर्व जर्मन सरकारच्या तज्ज्ञांचें एक मंडळ महिनाभराच्या अवधींत भारतांत येणार आहे. भारत सरकारच्या प्रतिनिधींशीं वाटाघाटी करून मंडळ कारखान्याची योजना सादर करील. चित्रपटांसाठी लागणारी निरनिराळया प्रकारची ४० ते ५० कोटी फूट लांबीची कच्ची फिल्म कारखान्यांत तयार करण्यांत येईल अशी अपेक्षा आहे. तथापि, उत्पादनाच्या तपशीलवार योजना जर्मन तज्ज्ञांशीं वाटाघाटी करून ठरविण्यांत येतील. ह्यासंबंधीं जर्मन तज्ज्ञांच्या दुसऱ्या एका मंडळानें कांहीं माहिती ह्यापूर्वींच सादर केलेली आहे. करमणुकीखेरीज शिक्षणासारख्या महत्त्वाच्या बाबतींतहि चित्रपटांना फार महत्त्वाचें कार्य करतां येतें. त्या दृष्टीनें, भारत सरकारनें हातीं घेतलेला हा उपक्रम अतिशय उचित असाच आहे.

---

## मुद्रित-शोधकांची संघटना

मुद्रित-शोधक मंडळाची स्थापना व मंडळाचें पहिल्या वर्षांतील कार्य, ह्याची माहिती आजच्या अंकांत पृष्ठ ४७ वर देण्यांत आली आहे. मुद्रणाचा आत्मा म्हणजे उत्तम मुद्रित—शोधन; पण प्रूफ-रीडरांच्या इतके उपेक्षित दुसरे कोणी व्याव-सायिक नसतील ! त्यांच्यावर दोषांचें खापर फोडण्याला सर्वजण तयार; पण त्यांच्या अडचणी लक्षांत घेऊन त्या सोडविण्याला छापखान्यांचे मालकहि तयार नसतात ! प्रूफ-रीडरांना आवश्यक ते शब्दकोशहि देण्यांत येत नाहींत; पण अपेक्षा मात्र अशी कीं त्यांनीं नामवंत विद्वानांच्या लिखाणांतील मूळ चुकाहि दुरुस्त कराव्या ! बरें, चुका दाखविण्याचीहि सोय नाहीं; त्यामुळें वडयांचा अपमान व्हावयाचा ! प्रूफ-रीडरांचें वेतनमान त्यांच्या-वरील जबाबदारीच्या मानानें फारच अल्प ठरविण्यांत आलें आहे. मुद्रित-शोधक मंडळाच्या स्थापनेस ही परिस्थिति कारणीभूत झाली असली, तरी मंडळाची भूमिका केवळ ट्रेड युनियनच्या तात्कालिक स्वार्थी दृष्टीची नसून, सांस्कृतिक व व्यावसायिक स्वरूपाची आहे, हें मंडळानें केलेल्या भरीव काम-गिरीवरून दिसून येईल. लेखक, प्रकाशक व मुद्रक ह्यांच्या अडचणींचा अभ्यास करून कांहीं खास सोई उपलब्ध करून देण्याचा नवा उपक्रम मंडळ करणार आहे; त्या सोईचा उपयोग वाढत्या प्रमाणावर करून घेतला गेल्यास, मराठी वाचकांचा म्हणजे सामान्य जनतेचा, खराखुरा फायदा होणार आहे. मुद्रित-शोधक मंडळाच्या ध्येयनिष्ठ सेवेचें चीज होवो !

---

## छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासासाठी तरतूद

छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासासाठी चालू आर्थिक वर्षांत राज्य सरकारांस देण्याकरतां ४·५ कोटी रुपयांवर रक्कम मंजूर करण्यांत आली.

गेल्या दोन वर्षांत चालू केलेल्या सढळ मदतीच्या स्वरूपा-नुसार दिलेली ही मदत योजनेंत सदर वर्षासाठी ठरविलेल्या रकमेपेक्षाहि जास्त आहे. याशिवाय छोट्या उद्योगधंद्यांना हप्तेबंदीनें यंत्रसामुग्री पुरविण्यासाठी छोट्या उद्योगधंद्यांच्या औद्योगिक वसाहतींस, औद्योगिक सहकारी संस्थांस व इतर योजनांस चालू वर्षांत ५·५ कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. येत्या वर्षांत आणखी रकमेची तरतूद होण्याचा संभव आहे.

## हिंदी कापडाची निर्गत कशी वाढेल ?

भारताच्या निर्गत मालांत कापडास महत्त्वाचें स्थान आहे. दरसाल सुमारें ६५ ते ७० कोटी रु. कापडाची आपण निर्गत करतों. म्हणजे, एकूण निर्गतींत कपास कापडाचा हिस्सा सुमारें १२% आहे. तथापि, पंचवार्षिक योजनेसाठीं लागणारी परराष्ट्रीय हुंडणावळ उपलब्ध करून देण्याची वाढती आवश्यकता लक्षांत घेतली तर ताग, चहा व कपास कापड ह्यांची निर्गत खूपच सुधारायला हवी. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचे अखेर कापड-गिरण्यांनीं दरसाल १०० कोटी वार कापडाची निर्यात करून ३७५ कोटी रुपयांची परदेशी हुंडणावळ मिळवून द्यावी, अशी नियोजन मंडळाची अपेक्षा आहे. परंतु परदेशी बाजारपेठेंतील मागणी तर कमी होत चालली आहे व त्यामुळें स्पर्धा तीव्रतर होत आहे.

लँकेशायर दहा वर्षांपूर्वी दरसाल ७०० कोटी वार कापडाची निर्यात करीत असे. आतां त्याची निर्यात फक्त ७० कोटी वार कापडावर आली आहे. नवे नवे देश कापड निर्यात करूं लागले आहेत, त्यामुळें बाजारपेठेंत प्रत्येकाला कमी वाव राहूं लागला आहे. पाकिस्ताननें बऱ्याच नव्या गिरण्या चालू केल्या आहेत, त्यांना तें सरकार सढळ हातानें मदत करीत आहे.

आशियांतील देशांत जपानची आघाडी तर विशेषच जाणवत आहे. जागतिक बाजारपेठांवर त्यानें पुनः पकड बसविली आहे. जपानी गिरण्यांतील ९०% माग स्वयंचलित ( ऑटोमॅटिक ) असून गिरण्यांतील सर्व यंत्रसामुग्री अद्यावत् आहे. तेथील कामगारांचा नव्या सुधारणांना विरोध नाहीं. त्यामुळें तेथील उत्पादनशक्ति अमेरिकेंतील उत्पादनशक्तीशीं सुद्धां स्पर्धा करूं शकते. जपानी उत्पादनापैकी ४०% उत्पादन परदेशीं निर्यात केलें जातें.

### जागतिक बाजारपेठेची वांटणी

| देश | १९५० | १९५१ | १९५२ | १९५३ | १९५४ | १९५५ | १९५६ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन (कोटी चौ. वार) | ८२ | ८६ | ७१ | ७० | ६३ | ५५ | ४७ |
| यु. एस. ए. „ | ५६ | ८१ | ७७ | ६३ | ६३ | ५५ | ५२ |
| जपान „ | ११० | १०९ | ७६ | ९१ | १२८ | ११४ | १२६ |
| जर्मनी „ | १२ | २३ | २७ | २३ | २३ | २४ | २१ |
| इटली „ | ३५ | ३७ | १७ | १४ | १० | १० | ९ |
| भारत ( कोटी वार ) | ११३ | ७८ | ५९ | ६३ | ८३ | ७४ | ७२ |

हिंदी गिरण्यांपैकी बहुतेकांतील यंत्रसामुग्री जुनी झालेली आहे. त्यामुळें स्पर्धेत टिकाव धरणें हिंदी कापडाला कठीण जात आहे. अद्यावत् यंत्रसामुग्री व उत्पादनाचें नवें तंत्र ह्यांचे अभावीं, हिंदी उत्पादनाची निर्गत वाढणें कठीण आहे. आहे तीच चालू राहणेंहि सोपें नाहीं, हें लक्षांत घेऊन भारत सरकारनें ३५ कोटी वार उत्पादनाचे १८,००० स्वयंचलित माग बसविण्यास परवानगी दिली आहे. पण त्याबाबत अटी इतक्या कडक आहेत, कीं ते माग बसविण्याची गति अतिशय मंद आहे. ह्याचा अर्थ, त्या अटी सैल करून गिरण्यांना आधुनिकीकरणास प्रोत्साहन दिलें पाहिजे. हिंदी गिरण्यांतील कापडाचा उत्पादनाचा खर्च उतरल्याखेरीज निर्गतच नव्हे, तर स्थानिक खपाहि वाढणें अवघड होईल. ह्यासाठी एक्साइज पट्टी कमी करण्याची गिरणी-मालकांची मागणी आहे. आहे ह्या परिस्थितींतहि सरकारी मदतीनें, ग्राहकांच्या आवडी-निवडीच्या अभ्यासानें, कापडाचा दर्जा सुधारून, कापड-निर्गतीचें १००कोटी वारांचें लक्ष्य गाठतां येणें अगदींच अशक्य नाहीं.

### भारतांतील कपास कापडाच्या गिरण्या

| वर्ष | गिरण्या | चात्या (·०००) | माग |
|---|---|---|---|
| १८५४ | १ | ३० | ... |
| १८५८ | ४ | १०८ | ३०० |
| १८६९ | १७ | ३९३ | ४,६०० |
| १८८० | ५८ | १,४७१ | १३,००० |
| १८८९ | १०८ | २,६६७ | २२,००० |
| १९०० | १९३ | ४,९४५ | ४०,१२४ |
| १९१० | २६३ | ६,१९६ | ८२,७२५ |
| १९२० | २५३ | ६,७६३ | १,१९,०१२ |
| १९३० | ३४८ | ९,१२५ | १,७९,२५० |
| १९४० | ३८८ | १०,००६ | २,००,७६० |
| १९५० | ४२५ | १०,८४९ | १,९९,७७५ |
| १९५६ | ४६५ | १२,३७६ | २,०६,५८० |

### भारतांत ग्राहकांना उपलब्ध कापड

| वर्ष | लोकसंख्या ( कोटी ) | कापड उत्पादन व आयात वजा निर्गत (हातमाग, यंत्रमाग धरून) ( कोटी वार ) | उपलब्ध कापड ( दर माणशीं, वार ) |
|---|---|---|---|
| १९४८ | ३४·९ | ५२,७९ | १५·१ |
| १९४९ | ३५·३ | ४९,११ | १३·९ |
| १९५० | ३५·७ | ३४,७८ | ९·७ |
| १९५१ | ३६·१ | ४२,३८ | ११·७ |
| १९५२ | ३६·५ | ५२,७५ | १४·४ |
| १९५३ | ३६·९ | ५५,६६ | १५·० |
| १९५४ | ३७·३ | ५५,८६ | १५·० |
| १९५५ | ३७·७ | ५९,५१ | १५·८ |
| १९५६ | ३८·१ | ६२,७५ | १६·५ |
| १९५७ (जाने.-ऑग.) | ३८·३ | ४३,९० | ... |

**राष्ट्रीय कर्जाच्या मर्यादेची वाढ**—अमेरिकेच्या प्रतिनिधी गृहानें राष्ट्रीय कर्ज किती असावें ह्यासंबंधीची कमाल मर्यादा २,७५,००० कोटी डॉलर्सवरून २,८०,००० कोटी डॉलर्सपर्यंत कर्जाची वाढविली आहे. मर्यादा वाढविणारें बिल आतां सिनेट सभेकडे पाठविण्यांत येईल.

**मेंदूंतील गांठ पाहणारें यंत्र**—रशिअन शास्त्रज्ञांनीं मेंदूंतील गांठ पाहणारें एक टेलिव्हिजनचें यंत्र तयार केलें आहे. यंत्राच्या साह्यानें अशा गांठीची जागा निश्चित करतां येइल. येत्या एप्रिलमध्यें ब्रुसेल्समध्यें भरणाऱ्या जागतिक प्रदर्शनांत हें यंत्र दाखविण्यांत येणार आहे.

"कण आणि क्षण" चें
गुजराती भाषांतर
સુખી જીવનની
પગદંડી
दुसरी आवृत्ति. ][ १ रु. ८ आ.

"पुढें पाऊल" चें
गुजराती भाषांतर
સદાચારને પગલે
नुकतेंच प्रसिद्ध झालें.
किं. १ रु. ४ आ.

## सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि., कराड

### रजिस्ट्रार, डॉ. शेख, ह्यांच्या भेटीच्या वेळीं चेअरमन, श्री. नी. आ. कल्याणी, ह्यांनीं केलेलें निवेदन

( १ )

आपण सहकारी खात्याचे रजिस्ट्रार होऊन नुकतेच सात आठ महिने झाले. एवढ्या अल्पावधींत आपण लोकांमध्यें एक प्रकारचा नवीन उत्साह निर्माण केल्यामुळें सहकारी चळवळीस चांगलीच चालना मिळाली असल्याचें कबूल केल्याशिवाय राहवत नाहीं. मुंबई लँड मॉर्गेज बँकेच्या गेल्या वार्षिक सभेमध्यें लँड मॉर्गेज बँकांबद्दलचें पूर्वीचें धोरण आमूलाग्र बदलून त्यांच्या कामकाजांत येणाऱ्या अडचणी दूर करण्याचें आश्वासन आपण दिल्यानें आमच्या सारख्या कार्यकर्त्यांना या कामांत एक प्रकारची आशा वाटूं लागली आहे. शेतकरी बांधवांना लौकरांत लौकर कर्ज मिळण्याची योजना आंखून त्याप्रमाणें आपण जिल्हा लँड मॉर्गेज बँकांना नवीन विहिरीकरितां व विहीर दुरुस्तीकरितां ४००० रु. पर्यंतचें कर्ज आणि इतर कारणांकरितां २००० रु. पर्यंतचें कर्ज अखेर मंजुरीचे अधिकार देण्यांत यावेत असें सरकारकडे सुचविलें आहे. त्याप्रमाणें मुंबई लँड मॉर्गेज बँकेची पत वाढावी म्हणून गेल्या मार्चमध्यें १० लाख रुपयांचे शेअर्स सरकारकडून खरेदी करणेंत आले. आणखी ४० लाख रुपयांचे शेअर्स सरकारकडून खरीदले जाण्याचे आहेत. त्याप्रमाणें कर्ज-रोखे विक्रीस काढणेपूर्वी १२ लाखांचें तात्पुरते कॅश क्रेडिटहि आपल्याच कारकीर्दीत मंजूर झालेलें आहे. या योजनेमुळें मुंबई राज्यांत लँड मॉर्गेज बँकेस भांडवलाची उणीव न भासतां तिचें काम अखंड चालू राहण्यास मदत झालेली आहे. एवढेंच नव्हे तर लँड मॉर्गेज बँकांकरितां लँड व्हॅल्यूएशन ऑफिसर्सच्या फ्री सर्व्हिसेस देण्याचें प्रपोजलहि आपणाकडून गेल्याचें समजतें. यावरून रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टांतील शिफारशीप्रमाणें लांब मुदतीच्या कर्जाचे चळवळीचे पुनरुज्जीवनाकरितां आपण प्रयत्न करीत आहांत असें स्पष्टच दिसून येतें. आतां मात्र या चळवळी-बद्दल एक प्रकारचा उत्साह वाटण्यास कांहींच हरकत नाहीं. आपण अल्पावधींतच केलेल्या व करणार असलेल्या परिश्रमा-बद्दल ही बँक आपली अत्यंत ऋणी आहे.

### बँकेचें कार्यक्षेत्र व कामकाज

या बँकेस २२ वर्षें पुरीं होऊन २३ वें वर्ष चालू आहे. महाबळेश्वर, जावली, सातारा, पाटण, माण, खटाव, खानापूर, शिराळा पेटा हा भाग डोंगराळ असून जमिनी तुरळक हलक्या प्रतीच्या व कमी क्षेत्राच्या आहेत. फक्त कोरेगांव, कऱ्हाड, वाळवा, तासगांव व मिरज हाच भाग खऱ्या अर्थानें शेतीचा असल्यानें शेतकरी बांधवांच्या हिताच्या दृष्टीनें ऑफिसचें काम-काजास कऱ्हाड हें सोयीस्कर ठिकाण ठरविण्यांत आलें. आहे. संस्थांनी भाग विलीन झाल्यानंतर या जिल्ह्याचे २ जिल्हे झाले. तेव्हांपासून दक्षिण सातारा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या आग्रहा-वरून या बँकेच्या कार्यक्षेत्रांत दोन्ही जिल्हे संयुक्त होऊन १९५० सालीं तिकडील सभासदांचे सोयीकरितां सांगली येथें या बँकेनें शाखा काढलेली आहे. त्यामुळें शेतकऱ्यांची सोय झाली. परंतु या बँकेस मात्र १९५४–५५ अखेर सहा वर्षें नुकसानींतच काढावीं लागलीं. त्यानंतर सर्व नुकसान भरून काढून गेलीं ३ वर्षें बँक फायद्यांतच आहे.



## The Bank of Maharashtra Ltd., Poona 2.

# NOTICE

Notice is hereby given that the twentythird Annual General Meeting of the share-holders of the Bank of Maharashtra Ltd., will be held at the registered office of the Bank, Maharashtra Bank Building, Poona City, on Saturday, the 8th March, 1958, at 3 p. m. (S. T.) to transact the following business:

(1) To receive and consider the Balance Sheet, the Profit and Loss Account and the Reports of the Directors and of the Auditors for the year ended 31st December, 1957.

*(2) To declare a Dividend.

(3) To elect three Directors in the places of the retiring Directors who are eligible for re-election.

(4) To appoint Auditors and to fix their remuneration and to consider and if thought fit to pass the following resolution of which Special Notice under Section 225 (1) of the Companies Act, 1956 has been received by the Bank.

Resolved that M/s G. D. Apte & Co. Chartered Accountants, Poona be appointed joint Auditors of the Company for the current year with M/s Kulkarni & Khanolkar in place of Shri G. D. Apte.

Poona City, Dated: 30th January, 1958.

By order of the Board, **C. V. JOAG,** Manager.

**N. B.:** (a) A member entitled to attend and vote is entitled to appoint a proxy to attend and vote instead of himself and a proxy need not be a member.

(b) The Share Transfer Books of the Bank will be closed from the 22nd day of February, 1958 to the 8th day of March, 1958, both days inclusive.

* The Dividend, when declared, will be payable on and after Saturday, the 22nd March, 1958 and the Dividend Warrants will be posted to registered addresses of the shareholders. Change of address, if any, should immediately be communicated to the Bank.

## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार

## उ. सातारा जिल्हा बँकेची दहिवडी शाखा

### रजिस्ट्रार, डॉ. ए. यू. शेख, ह्यांच्या हस्तें उद्घाटन

उत्तर सातारा जिल्हा मध्यवर्ति बँकेच्या दहिवडी शाखेचें उद्घाटन दिनांक २०-१-५८ रोजीं मुंबई राज्याचे सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार डॉ. ए. यू. शेख यांच्या हस्तें झालें. त्यावेळीं कर्मवीर भाऊराव पाटील व तालुक्यांतील सुमारें ५०० प्रमुख कार्यकर्ते हजर होते.

पाहुण्यांचें स्वागत केल्यानंतर व संदेश वाचन झाल्यानंतर बँकेचे चेअरमन श्री. र. दौ. पाटील यांनीं डॉ. शेख यांची थोडक्यांत ओळख करून दिली व बँकेच्या गतकालांतील कामाचा आढावा घेऊन आजरोजीं आपल्या बँकेच्या ६ व्या शाखेचें उद्घाटन करीत आहोंत असें सांगितलें. सदर बँक जिल्ह्यांतील गरजू शेतकऱ्यांना सुमारें ३५ लाखपर्यंत कर्ज पुरवते. तसेंच या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना सोनें-चांदीच्या तारणावर कर्जपुरवठा करण ही अत्यंत निकडीची बाब आहे व त्याकरितां लहान शेतकऱ्यांना आतांपर्यंत बँकेनें १० लाखांपर्यंत कर्जपुरवठा केला आहे. अशा तऱ्हेची सोय या भागांतील शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणें आवश्यक आहे. त्या दृष्टीनें ही बँक जनतेची आटोकाट सेवा करण्याचा प्रयत्न करीत आहे.

### कर्मवीर भाऊराव पाटील ह्यांचें भाषण

तदनंतर कर्मवीर भाऊराव पाटील यांनीं जमलेल्या श्रोतृजनांस उद्देशून सांगितलें कीं, आजच्या सभेचे अध्यक्ष श्रीयुत डॉ. शेख हे गरीब व सालस कुटुंबांतून आपल्या हुशारीनें व कर्तबगारीनें वर आले आहेत. गरीब शेतकऱ्यांचा उत्कर्ष व्हावा या तळमळीनें ते काम करीत आहेत. नंतर कर्मवीर भाऊराव पाटील म्हणाले कीं, शेतकऱ्यांनीं आपल्या उत्पन्नांत थोडीफार बचत करून आपल्या ठेवी या बँकेंत ठेवाव्यात. नंतर ते म्हणाले कीं, शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा शक्यतों जास्त प्रमाणांत भागविल्या जातील अशा तऱ्हेचा कर्ज-पुरवठा बँकेकडून केला जावा. तसेंच धान्याच्या तारणावर शेतकऱ्यांना कर्ज मिळूं शकेल अशा तऱ्हेच्या सोयी बँकेकडून केल्या जाव्यात.

### डॉ. शेख ह्यांचें भाषण

नंतर डॉ. शेख अध्यक्षीय भाषण देतांना म्हणाले कीं, श्रीयुत यशवंतराव चव्हाण, मुख्य मंत्री मुंबई राज्य, व श्री. बाळासाहेब देसाई, बांधकाम मंत्री, मुंबई यांनीं या बँकेच्या स्थापनेपासून तिच्या उत्कर्षासाठी अखंड प्रयत्न केले व काळजी घेतली व त्यांना इतरांचें योग्य तें साहाय्य मिळालें म्हणूनच आज ही बँक एका प्रगतिपर व भरीव स्वरूपांत आपल्याला दिसत आहे. जिल्हा मध्यवर्ति बँकांत अशा तऱ्हेचें यश क्वचितच लाभलेलें दिसतें. या जिल्ह्यांतील शेतकरी आर्थिक दृष्टीनें कांहीं अंशीं स्वावलंबी झाल्याचें दिसतें. अर्थात् यांत बँकेच्या प्रयत्नांचें यश अंतर्भूत आहे ही बाब निराळी सांगण्याचें कारण नाहीं. नंतर त्यांनीं आपल्या भाषणांत द्वितीय पंचवार्षिक योजनेंतील सहकारी चळवळीचीं उद्दिष्टें व योजना यांची थोडक्यांत कल्पना देऊन शेतकऱ्यांना लागणारें कर्ज रिझर्व्ह बँकेकडून सहकारी बँकांमार्फत माफक व्याजाच्या दरानें पुरविलें जाण्याची योजना समजावून सांगितली. विशाल मुंबई राज्यांतसुद्धां सहकारी चळवळीची प्रगति करण्याचा सरकारचा इरादा आहे. शेतकऱ्यांनीं जमिनीची मशागत चांगल्या प्रकारें करून चांगलें बीं, अवजारें, खत वगैरे वापरून अन्नधान्य मोठ्या प्रमाणांत उत्पन्न केलें पाहिजे, असा त्यांनीं उपदेश केला. नंतर पाणीपुरवठा, सामुदायिक शेती, यासंबंधींच्या सहकारी योजनांची माहिती सांगितली. तसेंच भात-शेतीच्या नवीन योजनेसंबंधीं त्यांनीं उद्बोधक अशी माहिती सांगितली.

या योजनांसंबंधीं माहिती सांगतांना डॉ. शेख म्हणाले कीं, या योजना यशस्वी होण्यासाठी सरकारी नोकरांशिवाय अन्य सामाजिक कार्यकर्त्यांच्या सहकाराची अत्यंत आवश्यकता आहे. तेव्हां त्या दृष्टीनें यथाशक्ति सर्वांनीं या सरकारी योजना यशस्वी करण्यासाठी हातभार लावावा ही विनंती. नंतर शेतीच्या मालास चांगले भाव मिळावेत यासाठी सरकारी कोठारांची योजना, खरेदी-विक्री संस्था, यासंबंधीं माहिती सांगून मुंबई राज्यांतील सहकारी साखर कारखानें कशा रीतीनें काम करीत आहेत याची कल्पना दिली. सहकारी पद्धतीनें शेतकऱ्यांच्या व अन्य जनतेच्या गरजा भागविल्या गेल्या पाहिजेत असें उद्दिष्ट द्वितीय पंचवार्षिक योजनेंत आंखण्यांत आलें आहे. तेव्हां तें उद्दिष्ट सफल झाल्यास देशाचें कल्याण होईल अशी आशा व्यक्त केली.

यानंतर श्री. आबासाहेब जानुगडे यांनीं सर्वांचे आभार मानल्यावर सभेचा कार्यक्रम संपला. तदनंतर डॉ. शेख यांच्या हस्तें शाखेचें उद्घाटन करण्यांत आलें.

---

## तकावीवर खरेदी केलेलीं ऑईल इंजिनें

### सरकारमान्य कंपन्यांची यादी

ऑईल-इंजिनसाठी तकावी कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना असें सुचविण्यांत येतें कीं ते सरकारमान्य यादींतील कोणतेंहि इंजिन किंवा पंपिंग सेट घेऊं शकतात. ठराविक कंपनीचें इंजिन अथवा पंपिंग सेट घेण्याविषयीं शेतकऱ्यांवर सक्ति करण्यांत येणार नाहीं.

मेसर्स कूपर आणि किर्लोस्कर या दोन कंपन्यांच्या इंजिनांचा सवलतीच्या दरानें पुरवठा करण्याची व्यवस्था सरकारनें १९५२ मध्यें केली होती. कंपन्यांना सरकारकडून मिळणाऱ्या ॲड्व्हान्स रकमेवर सदरहू इंजिनांचा पुरवठा करण्यांत येत होता. शेतकऱ्यांना मंजूर केलेल्या तकावी-कर्जावर या दोन कंपन्यांनीं इंजिनांचा पुरवठा करावा असें ठरविलें होतें. १९५३ मध्यें या पद्धतींत सुधारणा करण्यांत येऊन एक सर्वसामान्य योजना आंखण्यांत आली. यामुळें देशी इंजिनांच्या सर्व कारखानदारांना क्षेत्र खुलें झालें. सरकारमान्य यादींतून कोणतेंहि इंजिन निवडून घेण्याची मुभा शेतकऱ्यांना देण्यांत आली आहे.

सरकारमान्य यादींतील इंजिन किंवा पंपिंगसेट तयार करणाऱ्या कारखानदारांचीं किंवा ते पुरवठा करणारांचीं नांवें पुढीलप्रमाणें आहेतः—मेसर्स कूपर इंजिनिअरिंग, सातारा, मेसर्स टेक्सटूल कंपनी, कोयमतूर, मेसर्स किर्लोस्कर ऑईल इंजिन्स, पुणें ३, मेसर्स पॅको इंजिनिअरिंग, कोल्हापूर, मेसर्स इंडिअन कमर्शिअल कंपनी, मुंबई, मेसर्स ग्रेव्हेस कॉटन अँड को, मुंबई, मेसर्स कुलकर्णी इंजिनिअरिंग वर्क्स, इचलकरंजी, मेसर्स बाटलीबॉय अँड को., मुंबई आणि मेसर्स कोल्हापूर ऑटो वर्क्स, कोल्हापूर. आपलीं इंजिनें किंवा पंपिंग सेट यांचा मान्य यादींत समावेश करण्यास कारखानदार जेव्हां सरकारला विनंती करतात तेव्हां या यादींत वाढ करण्यांत येतें.

## मुद्रित-शोधक मंडळाची पहिल्या वर्षांतील कामगिरी

मुद्रण व्यवसायाची प्रगति व्हावयाची, ती सर्वांगीण होण्यासाठीं त्याच्या शाखोपशाखांची प्रगति झाली पाहिजे. यशस्वी, शुद्ध व स्वच्छ मुद्रणाचा आत्मा म्हणजे उत्तम मुद्रित-शोधन. त्यासाठी मुद्रित शोधकांच्या-प्रूफ-रीडरांच्या-संघटनेची स्थापना 'मुद्रित-शोधक मंडळ, पुणें' या नांवानें १९५६ मध्यें झाली. मुद्रित-शोधनाचा प्रत्यक्ष व्यवसाय करणारे आणि त्या व्यवसायाशीं संबंधित असे मंडळाचे सुमारें ७५ सदस्य आहे.

### मंडळाची भूमिका

मंडळाची भूमिका केवळ ट्रेड युनियनच्या धर्तीची नसून सांस्कृतिक व व्यावसायिक स्वरूपाची आहे हें विशेष होय. किमान-वेतन कायदा मुद्रण व्यवसायाला लागू झाला त्या वेळीं जें वेतनमान निश्चित करण्यांत आलें तें तयार करतांना मुद्रित-शोधन व्यावसायिकांची चौकशी स्वतंत्रपणें करण्यांत आली नाहीं; आणि म्हणून त्यांचें वेतनमान फारच अल्प ठरविण्यांत आलें, असा मंडळाचा दावा आहे. हा दावा श्रमिक पत्रकार कायदा वृत्तपत्रांतील मुद्रित-शोधकांना—प्रूफ-रीडरांना—लागू करतांना जी वेतनश्रेणी देण्यांत आली, त्यावरून अधिक बरोबर आहे असें मंडळाचें मत आहे.

### शुद्धलेखनांतील अराजकता

मराठींतील शुद्धलेखनामध्यें जी अराजकता व अनास्था दिसते ती उपलब्ध असलेल्या 'जुन्या' 'नव्या' शुद्धलेखन-नियमांमुळें आहे. जर सर्वमान्य असें एकसूत्रीकरण झालें तर तें अराजक कमी होईल. या दिशेनें मंडळानें सांगली येथें १९५७ सालीं भरलेल्या महाराष्ट्र मुद्रण परिषदेच्या अधिवेशनांत ठराव मांडला होता. नुकतीच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीनें 'मराठी लेखना'बाबतचे नियम तयार करण्यासाठी जी एक गोलमेज बैठक बोलावली होती त्यांत मंडळाच्या प्रतिनिधींनी भाग घेतला होता. त्यांत झालेल्या कांहीं निर्णयांचा फेरविचार होण्यासाठीं मंडळाने माध्यमिक शिक्षक संघ, प्राथमिक शिक्षक संघ, शिक्षणतज्ज्ञ, मुद्रक, साहित्यिक व प्रकाशक यांची एक बैठक, पुणें मुद्रक-संघाच्या वतीनें बोलवावी असा उपक्रम चालविला आहे. या सभेंतील निर्णय साहित्य परिषदेला कळवावे अशी योजना आहे.

मराठी शुद्धलेखनाचा एक तक्ता मंडळाने तयार केला असून तो गेल्या वर्षी सांगली येथाल अधिवेशनाच्या प्रसंगा, पुणें मुद्रक-संघाने छापून प्रसिद्ध केला आहे. त्यांत जुन्या व नव्या शुद्ध-लेखन-प्रणालींचा तौलनिक फरक दाखविला आहे. सदर तक्ता मुद्रक, मुद्रित-शोधक व विद्यार्थी यांना फारच उपयुक्त आहे.

### ज्ञानवर्धक वर्ग

महाराष्ट्र मुद्रण परिषदेमार्फत जे ज्ञानवर्धक वर्ग घेण्यांत येतात त्यांत मुद्रित-शोधनाचा वर्ग, डिसेंबर १९५६ मध्ये मंडळाकडून घेण्यांत आला. त्यांत मुद्रित-शोधनांताल अंगोपांगांसंबंधी व्याख्यानें व मार्गदर्शन मंडळ-कार्यकर्त्यांनी केलें. वर्गास सुमारे ४० विद्यार्थी उपस्थित होते. त्यांना प्रमाणपत्रें देण्यांत आलीं.

### नोकरी, व्यवसाय, इत्यादि

मंडळाकडे या वर्षी पांचजण मुद्रित-शोधन शिकावयास आले. त्यांतील दोघांना शिफारसपत्रें देण्यांत आलीं व त्यांना उद्योगहि मिळाला. बाकीच्या तिघांनी शिक्षण मधेच सोडून दिलें. नोकरी-व्यवसायासंबंधीं मंडळाकडे दोन तक्रारी आल्या. त्यांपैकी एकात समझोता होऊन ते गहस्थ कामावर हजर झाले. दुसरींतहि समझोता झाला, परंतु ते गृहस्थ कामावर हजर झाले नाहीत. दोघांना नोकरी-व्यवसाय मिळवून देण्याची खटपट करण्यांत आली व त्यांत मंडळाला यशहि मिळालें. कांहीं मंडळ-सदस्यांना किरकोळ कामहि उपलब्ध करून देण्यांत आलें.

### कांहीं नवे उपक्रम

लेखक, प्रकाशक व मुद्रक यांच्या अडचणींचा अभ्यास करून कांहीं खास सोयी उपलब्ध करून देण्याचा नवा उपक्रम मुद्रित-शोधक मंडळ आता सुरू करणार आहे.

सुवाच्य आणि शुद्ध अशी मुद्रण-प्रत (प्रेस-कॉपी) लिहून देणें. सर्वच लेखकांचें लेखन शुद्ध व सुवाच्य असतें असें नाहीं. शिवाय अथयावत् छपाईच्या दृष्टीनें ही मुद्रणप्रत जितकी नीटस असेल तितकी त्या पुस्तकाची छपाई शुद्ध, नीटस व लवकर होते. त्याचप्रमाणे लेखकाची मुद्रण-प्रत शुद्ध करून छपाई, टाईप, वगैरेंबाबत सूचना देऊन सुधारून देणें, अशा प्रकारच्या मुद्रण-प्रतीच्या कामाचें उद्‌घाटन नुकतेंच मंडळाच्या सर्व-साधारण सभेच्या वेळीं करण्यांत आलें. या सोईचा फायदा घेतला गेल्यास छपाईची प्रगति सुदृढ पायावर होईल असें वाटतें.

मोठ्या मुद्रणालयांप्रमाणे छोट्या मुद्रणालयांना मुद्रित-शोधक ठेवणें झेपत नाही. तेव्हा तें काम कोणाकडून आणि कसेंतरी करून ते घेतात आणि मग आपल्या ग्राहकांचा असंतोष पदरांत पाडून घेतात. तेव्हा अशा छोट्या दोन अगर तीन लहान मुद्रणालयांच्या एकेका गटाला मंडळामार्फत मुद्रित-शोधक पुरविले जातील. या योजनेबाबतचा तपशील मंडळामार्फत पुरविण्यांत येईल.

विद्यापीठें व सरकार यांनी पाठ्य-पुस्तकांच्या पसंतीबाबत 'मुद्रित-शोधक मंडळाची शिफारस' अनिवार्य ठेवल्यास मंडळाच्या कार्यास अधिक चालना तर मिळेलच, पण शुद्ध छपाईच्या प्रगतीस हातभार लावल्याचें श्रेयहि त्यांना मिळेल; आणि पालक व विद्यार्थी यांच्याकडून नंतर जे आक्षेप येतात तेहि येण्याचें बऱ्याच अंशीं टळेल.

---

**सहारांतील तेलाच्या खाणी**—फ्रान्सच्या ताब्यांत असलेल्या सहारा वाळवंटाच्या पूर्व भागांत तेलाच्या मोठ्या खाणी सापडल्या आहेत. एका ठिकाणीं खणण्यांत आलेल्या विहिरींत तर तेल उचंबळून वर येत आहे. त्यावरून आसपास आणखी तेल निघावें अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. नव्यानें खणण्यांत आलेल्या विहिरींत ४,५०० फुटांवरच तेल सांपडलें आहे.

**उत्तरप्रदेशाचें औद्योगीकरण**—उत्तरप्रदेशाच्या नियोजन बोर्डाच्या बैठकींत बोलतांना मुख्य प्रधान डॉ. संपूर्णानंद ह्यांनीं राज्याच्या औद्योगीकरणाविषयीं नापसंति व्यक्त केली. ते म्हणाले कीं, वीज-पुरवठा नाहीं म्हणून उद्योगधंदे नाहींत व ते नाहींत म्हणून विजेचा पुरवठा कमी आहे, ह्या चक्रांतून मार्ग काढल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

**मॉस्को-दिल्ली थेट विमानप्रवास**—मॉस्को ते दिल्ली ह्या मार्गावर थेट विमानप्रवासाची सोय करण्यासाठी उभयतां सरकारांच्या प्रतिनिधींत लवकरच बोलणीं सुरू होणार आहेत. उभयतांचे प्रतिनिधी मॉस्को येथें तपशिलासंबंधीं वाटाघाटी करतील. हा प्रवास मध्य आशिआंतील ताशकंद मार्गानें होईल. प्रवासांत हा एकच टप्पा असेल.

## तुमचें स्थान कोणतें ?

( लेखक : श्री. वा. काळे, किं. २ रु. )

"जीवनांतील बारीकसारीक प्रश्नांचा विचारपूर्वक ऊहापोह या पुस्तकांतील लेखांतून केलेला आहे. प्रत्येक कृति, चालणें, बोलणें, वागणें, हें किती काळजीपूर्वक करावयास पाहिजे, याची यथार्थ कल्पना येणें जरूर असतें. त्याशिवाय, जगांत कसें वागावें ह्याचें सम्यक् ज्ञान होणें कठीण आहे. ह्या पुस्तकाच्या वाचनानें हें ज्ञान होण्यास मदत होईल व मार्गदर्शन होईल."

—"महाराष्ट्र", फेब्रुवारी, १९५८

### साखरेच्या उत्पादनांत वाढ

हिंदी साखर कारखान्यांना १९३७ सालीं ९.६७ कोटी रुपये नफा झाला होता, तो १९५४ मध्यें ७५.६६ कोटी रु. झाला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरचें साखरेचें उत्पादन लक्ष्य २२,५०,००० टन आहे. परंतु, कारखान्यांचें आजचेंच उत्पादन ह्यापेक्षा ज्यास्त आहे. योजना-पूर्व उत्पादनाच्या सरासरीच्या मानानें उत्पादन ८६% ज्यास्त झालें आहे. तागाचे बाबतींत वाढीचें प्रमाण १२%, लोखंड-पोलादाचे बाबतींत ३३%, कपास कापडाच्या बाबतींत ४०%, कागदाचे बाबतींत ५८% व सिमेंटच्या बाबतींत ७८% आहे. १९५०–५१ मध्यें साखरेचें उत्पादन ११.२ लक्ष टन झालें होतें, तें १९५६–५७ मध्यें २०.२ लक्ष टन झालें.

### १९५७ मधील आयुर्विम्याचें काम

१९५७ मध्यें लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशननें २५६ कोटी रुपयांचें काम पुरें केलें. ३२० कोटी रुपयांच्या विम्यांसाठीं अर्ज आले होते. १९५६मध्यें, विम्याच्या राष्ट्रीयीकरणाच्या पहिल्या वर्षीं, कॉर्पोरेशननें १८८ कोटी रुपयांचें काम पुरें केलें होतें. १९५४ व १९५५ मधील पुऱ्या कामाचे आंकडे अनुक्रमें २३६ कोटी रु. व २३८ कोटी रु. असे होते. म्हणजे, राष्ट्रीयीकरणानंतरच्या दोन वर्षांतील कामाचा एकत्रित विचार केला, तर वार्षिक सरासरी, २२२ कोटी रु., त्यापूर्वींच्या सरासरीपेक्षा फारशी कमी नाहीं.

### स्टेट बँकेस १ कोटी, ८७ लक्ष रु. नफा

दि स्टेट बँक ऑफ इंडिआला १९५७ सालीं १,८७,४५,४०० रु. नफा झाला. भागीदारांना प्रत्येक भागास १६ रु. प्रमाणें डिव्हिडंड मिळणार आहे.

### परदेशी शिलकेंत २३२ कोटी रु. ची घट

रिझर्व्ह बँकेच्या परदेशांतील शिलकेंत १९५७ सालीं २३२ कोटी रुपयांची घट झाली. वर्षाचे प्रारंभीं असलेली ५२९ कोटी रु. ची शिल्लक वर्षअखेर २९७ कोटी रु. वर आली.

### चलनी नोटांत ४० कोटी रु. ची वाढ

चलनी नोटांच्या प्रसारांत १९५७ सालीं फक्त ४० कोटी रु. ची वाढ झाली; प्रारंभींच्या १४६६ कोटी रु. च्या चलनी नोटांचे ऐवजीं १५०६ कोटी रु. च्या चलनी नोटा वर्षअखेर प्रसारांत होत्या.


बचतीतून राष्ट्रसेवा

बचत करा — समृद्ध व्हा.

तुमच्या समृद्धीवर राष्ट्राची समृद्धी अवलंबून आहे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक गृह. गिरगांव, मुंबई ४.

शाखा: फोर्ट, दादर, माहिम, वरळी, पुणें, धेळगांव.

स्थापना सन १९३५ ..... ठे. नं. १६२५१८

दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १


( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९५,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( अध्यक्ष )
श्री. गे. गो. ढोले, ( उपाध्यक्ष )
श्री. उ. भा. तांबे, ( ऑ. मॅ. डायरेक्टर )
श्री. म. बा. बेंडे, ( ऑ. खजिनदार )
श्री. म. मा. वामन डायरेक्टर
श्री. गे. ल. पाटील नलवडे ,,
श्री. आ. पां. ढोरे ,,
श्री. ज्ञा. मा. मनसुख ,,
श्री. म. रा. नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.



किर्लोस्कर

अिलेक्ट्रिक पंपिंग सेट

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकावू.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी द. सातारा


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.